Peer Reviewed International Research Journal of Geography
Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika
ISSN : 0971-6785 {Impact Factor 3.687 (IIFS)} Vol. 33,No.2, Jul-Dec. 2016. pp 109-113

# TEMPORAL ANALYSIS OF LIVESTOCK IN MAHARASHTRA

Namdev Waghmare

***Abstract***

*Role of cattle wealth in agrarian and labour tendensive economy is very crucia.These cattle wealth playing very important role in provinding protein food like milk and meat, to enhance economic condition of farmer and labourers, to emprove production capacity and fertility of land, and other agricultural activities etc.In this present research paper researcher by to analyse, the relative changes in cattle wealth in Maharashtra state during 1961-2012. This present study indicates that as compare to 1961, cattle wealth grown only by 24.73% in 2012. Although, the no. of cattles grown on one hand, but availability of cattles for per lacks peples declined by127.59% during same period. This present study pointed but that, during to 2012 highest growth of 81.21% registered in account of buffalos followed by 54.46 ggowth in sheeps and Goats and other cattle grown by 24.73% during same period. Lowest growth registered regarding cows and bulls that is only 1.02%. During 1961-2012, numers of cattles in maharashtra grown very slowly thats mainly due to frequent drought prone situation in the state, lack of sufficient fooder and water availability and increase in number of non - vegetarian population also the main reason to decline the cattle population.*

**महाराष्ट्रातील पशुधनाचे कालसापेक्ष विश्लेषण**

**सारांश :** शेतकरी व शेतमजूरांच्या अर्थव्यवस्थेत पशुधनाची भूमिका अतिशय महत्वाची आहे. जमिनीची उत्पादन क्षमता व जमिनीची कस वाढवण्यासाठी दुध, मांस या अन्न घटक द्रव्याचा पुरवठा करण्यासाठी शेतकरी व शेतमजूरांची आर्थिक स्थिती सुधारण्याठी आणि शेतीची मशागत कामे करण्यासाठी पशुधनाची भूमिका फारच महत्वाची आहे. महाराष्ट्रातील १९६१ ते २०१२ या काळातील विविध पशुच्य संख्येत झालेल्या बदलाचा अभ्यास करता असे लक्षात येते की, १९६१ च्या तुलनेत २०१२ मध्ये दर लाख लोकसंख्ये मागे असलेल्या एकूण पशुच्या संख्येत १२७.५९ टक्क्यांनी घट झालेली आहे. ती ८१.२१ % इतकी आहे. त्यानंतर शेळ्या –मेंढ्याच्या संख्येतील वाढ ५४.४६ % इतर पशुधनाच्या संख्येत २४.७३%आणि टक्के आणि सर्वात कमीवाढ गाई–बैल या पशुधनाच्या संख्येत १.०२% इतकी झालेली आहे.

एकूण पशुधनामध्ये १९६१ ते २०१२ काळात झालेली वाढ फारच कमी आहे. कारण नेहमी चे दुष्काळ त्यातून निर्माण होणारी पाणी व चारा टंचाईची समस्या यामुळे पशुपालनाची संख्या कमी होत आहे. तसेच मांसाहारी लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे विविध पशुधनाच्या कत्तलीचे प्रमाण वाढलेले आहे. प्रस्तुत शोध निबंधामध्ये महाराष्ट्रातील १९६१ ते २०१२ या काळात विविध पशुधनाच्य संख्येत कालसापेक्ष झालेल्या बदलाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**बिल संज्ञा :** पशुधनातील कालसापेक्ष बदल

**प्रस्तावना :** पशुधनाद्वारे शेतीसाठी सेंद्रिय खाताचा पुरवठा होतो. ज्यामुळे शेतीची उत्पादकता वाढते.जमीनीचा कस टिकतो व वाढतो. या शिवाय शेतकऱ्यांना व शेतमंजूरांना सहज करता येणारा जोड व्यवसाय म्हणूनही पशुपालनाकउे पाहिले जाते. शेतकरी व शेतमंजरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पशुपालनाची भूमिका अतिशय महत्वाची आहे. म्हणूनच शेतकरी व शेतमजूरांसाठी पशुधन ही अतिशय महत्वाची साधनसंपदा आहे. मानवासाठी दुध व मांस हे अन्न घटकद्रव्य फज्ञरच महत्वाचे आहेत.या महत्वापूर्ण अन्न घटक द्रव्यांचा पुरवठा विविध प्रकारच्या पशुधनपासून होतो. म्हणून मानवी आरोग्यासाठी पशुधन महत्वाचे आहे.

महाराष्ट्रात पशुधनाच्या एकूण संख्येत १९६२ ते ११९७ याकाळातील पशुगणनते सातत्याने वाढ झालेली आहे. १९६२ मधरे २६०४८००० इतकी होती ती १९९७ मध्ये ३९६३८००० इतकी झाली. म्हणजे ३६ वर्षात एकूण पशुधनातील वाढ १३५९०००० इतकी झाली. परंतु १९६१ मध्ये दरलाख लोकसंख्येमागे पशुधनाची संख्या ६६००० इतकी पशुंची संख्या होती.ती १९९७ मध्ये ५०००० इतकी झाली म्हणजे दर लाख लोकसंख्येमागे १९६१ च्या तुलनेत १९९७ मध्ये एकूण पशुच्या संख्येत १६००० ने घट झालेली आहे. १९९७ ते २०१२ या काळातील चार पशुगणनेत मात्र एकूण पशुधनाच्या संख्येत घट झालेली आहे. १९९७ मध्ये महाराष्ट्रात एकूण पशु संख्या ३९६३८००० इतकी होती. ती २०१२ मध्ये ३२४८९००० इतकी झाली. म्हणजे महाराष्ट्रात १९९७ ते २०१२ या १५ वर्षामध्ये एकूण पशुची संख्या ७१४९००० ने घटलेली आहे. १९९२ ते १९९७ व २००३ ते २००७ या काळातील पशुगणना वगळता इतर प्रत्येक पशुगणनेनुसार दर लाख लोकसंख्येमागे असेलेली पशुची संख्या सातत्याने घटलेली आहे. १९६१ मध्ये दरलाख लोकसंख्येमागे एकूण पशूची संख्या ६६००० इतकी होती. तर २०१२ च्या पशुगणनेनुसार दर लाख लोकसंख्येमागे पशुची संख्या २९००० इतकी झाली. त्यात १२७.५९ टक्क्यानी घट झालेली आहे. म्हणजे १९६१ ते २०१२ या ५१ वर्षाच्या काळात महाराष्ट्रात दर लाख लोकसंख्येमागे पशुच्या संख्येत ३७००० ने घट झालेली आहे. ही घट चिंताजनक आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात पडणारे नेहमीचे दुष्काळ त्यातून निर्माण होणरी पाणी व चार टंचाई आणि मांसाहारी लोकसंख्ये वाढलेले प्रमाण, मांस विक्रीसाठी पशूच्या होणऱ्या कत्तली यामुळे पशुसंख्येत होणारी वाढ फारच कमी आहे.

**उद्दिष्टये :** १.महाराष्ट्रातील विविध पशुसंख्येतील कालसापेक्ष बदल अभ्यासणे व दर लाख लोकसंख्ये मागे पशुधनाची संख्या अभ्यासणे.

**माहितीस्त्रोत अभ्यास पध्दत :** प्रस्तुत शोधनिबंधासाठी आवश्यक आकडेवारी दुय्यम माहिती स्त्रोतद्वारे घेण्यात आलेली आहे. त्यासाठी महाराष्ट्राची आर्थिक पहाणी २०१४-१५ या महाराष्ट्र शासनाद्वारे प्रकाशित पुस्तिकेचा उपयोग करण्यात आलेला आहे. प्राप्त आकडेवारीनुसार कार्यकारण संबंध स्पष्ट करण्यात आलेला आहे. आकडेवारीचे सादरीकरण करण्यासाठी साधा स्तंभालेख या नकाशास्त्रीय पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**अभ्यासक्षेत्र :** प्रस्तुत शोधनिबंधासाठी महाराष्ट्र राज्याची निवड करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्याचे भौगोजिक स्थान भारताच्या पश्चिम भागात आहे. उत्तर भारत व दक्षिण भारत यांना जोडणारी विशाल भूमी म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. महाराष्ट्र राज्याचा अक्षवृत्तीय विस्तार १५°८ मिनीटे उत्तर ते २२°१ उत्तर अक्षवृत्ताच्या दरम्यान आहे. तर रेखावृत्तीय विसतार ७२°६ पूर्व ते ८०°९ पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३०७७१३ चौ.कि. मी. आहे. २०११ च्या जगणणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ११२३७४३३३ इतकी आहे ती भारताच्या एकूण लोकसंख्या ९.२८% आहे.

**विषय विवेचन :** महाराष्ट्रातील विविध पशुधनाची १९६१ ते२०१२ या काळातील आकडेवारी सारणी क्र. १ मध्ये देण्यात आलेली आहे. या सारणीच्या अवलोकनावरुन असे लक्षात येतेकी, महाराष्ट्रातील एकूण पशुधनामध्ये १९६१ ते १९९७ या काळात वाढ झालेली आहे. परंतु ही वाढ फारच कमी आहे. १९९७ ते २०१२ या काळातील प्रत्येक पशुगणनेनुसार मात्र एकूण पशुधनात सातत्याने घट झालेली आहे. १९९७ च्या तुलनेत


२०१२ मध्ये ७१४९००० इतकी घट झालेली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पशुची होणारी घट चिंताजनक आहे.

सारणी क्र. : १

| महाराष्ट्रात कालसापेक्ष पशुधनाची संख्या १९६१ ते२०१२ पशुधनाची संख्या | | | | | | | दर लाख लोकसंख्येमागे पशुधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | वर्ष | गाई-बैल | म्हशी-रेडे | शेळ्या-मेंढ्या | इतर | एकूण पशुधन | |
| 1 | 1961 | 15328000 | 3087000 | 273000 | 360000 | 26048000 | 66000 |
| 2 | 1966 | 14729000 | 3042000 | 7326000 | 352000 | 25449000 | 57000 |
| 3 | 1972 | 14705000 | 3301000 | 8038000 | 317000 | 26361000 | 52000 |
| 4 | 1978 | 15218000 | 3899000 | 10199000 | 326000 | 29642000 | 51000 |
| 5 | 1982 | 16162000 | 3972000 | 10376000 | 409000 | 30919000 | 48000 |
| 6 | 1987 | 16983000 | 4755000 | 12068000 | 449000 | 34255000 | 48000 |
| 7 | 1992 | 17441000 | 5447000 | 13016000 | 489000 | 36393000 | 46000 |
| 8 | 1997 | 18071000 | 6073000 | 14802000 | 692000 | 39638000 | 50000 |
| 9 | 2003 | 16738000 | 6084000 | 13624000 | 612000 | 37058000 | 36000 |
| 10 | 2007 | 16184000 | 6073000 | 13301000 | 397000 | 35954000 | 37000 |
| 11 | 2012 | 15484000 | 5594000 | 11016000 | 395000 | 32489000 | 29000 |

स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५

महाराष्ट्रातील पशुधन संख्या ( १९६१ - २०१२ )




१९६१ च्या पशुगणनेनुसार महाराष्ट्रात एकूण १५३२८००० गाई-बैल या पशुची संख्या होती ती १९६६ च्या पशुगणनेनुसार १४७२९००० इतकी झाली म्हणजे १९६१ च्यातुलनेत १९६६ मध्ये ५९९००० ने गाई-बैल या पशुधनामध्ये घट झालेली आहे. त्यानंतर १९६६ च्यातुलनेत १९७२ मध्ये २४००० ने घट झाली. त्यानंतर मात्र १९७२ ते १९९७ या काळातील प्रत्येक पशुगणनेनुसार मात्र गाई बैलांच्यासंख्येत वाढ झाली. मात्र ही वाढ फारसी जास्त नाही. १९६१ ते १९८७ या २६ वर्षात गाई-बैलाच्या संख्येत १४५३२८००० वरुन १६९८३००० अशी वाढ झाली. ही वाढ १६५५००० इतकी झाली. तर १९८७च्या तुलनेत २०१२ मध्ये गाई-बैलांच्या संख्येत

१४९९००० इतकी घट झालेली आहे.

१९६१ मध्ये महाराष्ट्रामध्ये म्हशी व रेड्यांची एकूण संख्या ३०८७००० इतकी होती. ती १९८७ च्या पशुगणनेनुसार ४७५५००० इतकी वाढली तर १९८७ ते २०१२ या काळात ८३९००० इतकी वाढ झाली. तर म्हशी रेड्यांच्या संख्येत सर्वात जास्त वाढ १९८२ ते १९८७ या पशुगणनेच्या काळात झाली ती ७८३००० इतकी झाली तर सर्वात जास्त घट २००७–२०१२ या पशुगणनेच्या दरम्यान झाली ती घट ४७९००० इतकी आहे.

महाराष्ट्रात १९६१ मध्ये शेळ्या – मेंढयाची संख्या ७२७३०० इतकी होती. ती १९६६ मध्ये ७३२६००० इतकी झाली म्हणजे १९६१ ते १९६६ च्या काळात शेळ्या–मेंढ्याच्या संख्येत ५३००० इतकी वाढ झाली. त्यानंतर १९६६–१९७२ या काळात ७१२००० ते १९८२–८७ या काळात १९९२००० ने १९८७–९२ या काळात ९४८००० ने तर १९९१–९७ या काळात १७८६००० ने शेळ्या मेंढ्याच्या संख्येत वाढ झालेली ाहे. तर १९९७ ते २०१२ या काळात मात्र शेळ्या–मेंढ्याच्या संख्येत सातत्याने होत गेलेली आहे.शेळ्या–मेंढ्याच्या संख्येत सर्वात जास्त वाढ १९७२–७८ या काळात झालेली आहे. ती २१६१००० इतकी आहे. तर सर्वात कमी वाढ १९६१–६६ या काळात झालेली आहे ती ५३००० इतकी आहे. तर शेळ्या मेंढ्याच्या संख्येत सर्वाधिक घट २००७–१२ या काळात झालेली  आहे. ती २२८५००० इतकी आहे. शेळ्या –मेंढ्याच्या संख्येत १९६१ च्या तुलनेत २०१२ मध्ये म्हणजे ५१ वर्षाच्या कालावधीमध्ये ३७४३००० इतकी वाढ झालेली आहे.

गाई–बैल, म्हशी–रेडे, शेळ्या –मेंढ्या यांच्याशिवाय इतर पशुचा एक गट करण्यात आलेला आहे. या इतर पशुधनाच्या गटामध्ये घोडे, गाढव, खेचर व डुकरे यांचा समावेश करण्यात आलेला आहे. महाराष्ट्रातील इतर पशूच्या संख्येचा अभ्यास करता असे लक्षात येते की, १९६१ मध्ये महाराष्ट्रात इतर पशुची संख्या ३६००००० इतकी होती ती १९७८ पर्यंत म्हणजेच १९६१ च्या नंतरच्या तीन पशुगणनेनुसार सातत्याने घटत गेलेली आहे. १९६१ च्या तुलनेत १९७८ मध्ये इतर पशुची संख्या ३४००० ने घटली तर १९७८ पासून १९९७ पर्यंतच्या पशुगणनेत ही संख्या सातत्याने वाढत गेलली आहे. १९७८–१९९७ या काळात इतरपशुच्या संख्येत ३६६६००० इतकी वाढ झालेली आहे. १९९७ ते २०१२ या काळात इतर पशुच्या संख्येत मात्र झपाट्याने घट झालेली आहे. १९९७ मध्ये इतर पशुची संख्या ६९००० इतकी होती ती २०१२ मध्ये ३९५००० इतकी झाली. ही घटक २९७००० इतकी म्हणजे ५० टक्केच्या जवळ पास आहे.

महाराष्ट्रात दर लाख लोकसंख्ये मागे १९६१ मध्ये ६६०००पशुधनाची संख्या होती ती २०१२ मध्ये केवळ २९००० इतकीच आहे. म्हणजे १९६१ च्या तुलनेत २०१२ मध्ये ही संख्या३७००० ने घटलेली आहे. एकूण पशुच्या संख्येचा विचार करता १९६१ पासून २०१२ पर्यत झालेली २४.७३ टक्के वाढ ही फार कमी आहे. दुष्काळ व त्यापासून निर्माण होणारी पाणी टंचाई, चारा टंचाई तसेच शेतीच्या कामासाठी आधुनिक यंत्र सामुग्रीची उपलब्ध आणि मांसाहारी लोकसख्ये वाढते. प्रमाण व त्यासाठी होणारी विविध पशुच्या  कत्तली एकूण पशुधनाच्या संख्येत घट होण्यासाठी कारणीभूत आहेत.

**निष्कर्ष :** महाराष्ट्रातील पशुधनाचे कालसापेक्ष विश्लेषण केल्यानंतर असे लक्षात येते की, १९६१ च्या तुलनेत २०१२ या काळात गाई–बैल या पशुच्या संख्येत १.०२ टक्के ने, म्हशी–रेड्यांच्या संख्येत ८१.२१ टक्केने, शेळ्या–मेंढ्याच्या संख्येत ५१.४६ टक्केने इतर पशुच्या संख्येत ९.७२ टक्के ने तर एकूण पशुच्या संख्यत २४.७३ टक्के ने वाढ झालेली आहे. दर लाख लोकसंख्येमागे पशूच्या संख्येत मात्र १९६१ च्या तुलनेत २०१२ मध्ये

५६.०९ टक्केने घट झालेली आहे. १९६१ ते २०१२ या ५१ वर्षामध्ये सर्वात कमी वाढ गाई – बैल (१.०२%) या पशुच्या संख्येत झालेली आहे . गाय बैल यापशुचे पालन जास्तीत जास्त शेतकरीच करतो.परंतु नेहमीच दुष्काळामुळे पाणी व चारा टंचाईमुळे शेतकऱ्यांनी गाय – बैल या पशुची संख्या फारच कमी झालेली आहे. तसेच त्यांच्या पालन पोषणासाठी होणारा खर्च व त्यापासून मिळणारे उत्पादन याचा विचार करता ते फारसे फायदेशीर नाही.गायीपासून दूध कमी तर मिळतेच परंतु त्या दुधाचे फॅट कमी असल्याने दुध उत्पादनासाठी गायी फारशा फायदेशीर नाहीत. म्हणून शेतकरी गायीचे पालन कमी प्रमाणात करत आहे.तसेच प्रत्येक शेतकरी बैलाचा उपयोग शेतीच्या मशागतीसाठी करतो. परंतु सध्या शेतीची कामे करण्यासाठी अनेक आधुनिक साधने उपलब्ध झालेली आहेत. त्यामुळे बैलाचे पालन करण्याचे प्रमाणही कमी झालेले आहे. तसेच १९६१ ते २०१२ या काळात सर्वात जास्त वाढ म्हशी–रेडयांच्या संख्येत झालेली आहे. ती ८१.२१ टक्के इतकी आहे. कारण म्हशी या दुध उत्पादनासाठी इतर कोणत्याही पशुच्या तुलनेत शेतकऱ्यांना व शेतमजूरांना परवडवणाऱ्या आहेत. त्याच्यापासून जास्तीत जास्त फॅट असलेले व जास्त दूध उत्पादन मिळते. त्यामुळे म्हशी पासून होणारा आर्थिक फायदा इतर कोणत्याही पशुच्या तुलनेत जास्त आहे. त्यामुळे म्हशीच्यासंख्येतील वाढ सर्वाधिक आहे १९६१ ते २०१२ या काळात शेळ्या – मेंढयाच्या संख्येत ५१.४६ टक्के ने वाढ झालेली आहे. शेळ्या मेंढ्या पालनसाठी होणारा खर्च व त्यापासून मिळणारे उत्पादन हे फायदेशीर आहे. शेळ्या मेंढ्याचे पालन शेतमजून (विशिष्ट वर्गच) करतो. ते त्याच्यासाठी परवडणारे आहे. इतर पशुच्या संख्येत मात्र १९६१ ते २०१२ या काळात ९.७२ टक्के वाढ झाली ती फारच कमी आहे. इतर पशुपासून फारसे उत्पादन मिळत नाही. म्हणून यांचे पालन पोषण करणारा विशिष्ट वर्ग व तो फारच कमी आहे. तर एकूण पशूच्या संख्येतील वाढ २४.७३ टक्के असून ती फारच कमी आहे. कारण नेहमीच दुष्काळ त्यातून चारा व पाणी टंचाई आणि मांसाहारी लोकसंख्येचे प्रमाण वाढल्याने मांस उत्पादनासाठी पशुच्या कत्तली मोठ्या प्रमाणात होत आहेत. तसेच पशुच्या आरोग्याकडेही दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे पशुच्या मृत्युची संख्याही जास्त आहे. पशुच्या संख्येत वाढ करण्यासाठी पशुपालनासंदर्भात शेतकरी व शेतमजूरांना प्रोत्साहनपर अनुदान दिले पाहिजे. पशुपालनापासून होणारे फायदे तसेच आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी पशु पालनाचा होणारा उपयोग हा सर्वसामान्य लोकांना सांगणे आवश्यक आहे. पशुचे पालन व्यवस्थितरित्या केल्यानंतर सर्वात जास्त फायदा देणारा व सर्वसामान्य लोकांना परवडणारा व्यवसाय म्हणून याकडे पाहिले जाणे आवश्यक आहे.तेव्हाच विविध पशुची संख्या वाढेल .

**संदर्भ ग्रंथ :**

१. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१४–१५.
२. महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधनपत्रिका, –भाग –३२, जुलै – डिसेंबर २०१५.
३. डॉ. मुकुंद गायकवाड (२०११) : पशुधन जोडधंडा नव्हे मुख्य व्यवसाय, उत्कर्षा प्रकाशन.
४. डॉ. सचिन काकडे, विश्वास तोरडमल (२०१०) : पशुधन पैदास, पोषण व व्यवस्थापन, गोडवा कृषी प्रक़ाशन.

***डॉ. नामदेव केशवराव वाघमारे**
भूगोलविभाग प्रमुख
इंदिरा गांधी महाविद्यालय, नांदेड